# आपली महानगरपालिका – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका

भारतातील नगरपरिषद प्रशासनाची सुरुवात १६८७ मध्ये मद्रास येथे स्थापन केलेल्या पहिल्या नगरपरिषदेपासून झाली. त्यानंतर लवकरच मुंबई आणि कलकत्ता येथे देखील नगरपरिषदा स्थापन करण्यात केल्या गेल्या. त्यानंतर देशाच्या विविध भागात स्थानिक स्वराज्य प्रशासन स्थापन करण्यात आले. इंग्रजांनी नागरी स्थानिक स्वराज्य प्रशासनाचा पाया घातला असल्यामुळे, ब्रिटिश अंमलाखाली असलेल्या प्रदेशात देखील स्थानिक स्वराज्य संस्था उभारल्या गेल्या. तत्कालीन हैद्राबाद संस्थानातील नांदेड शहर ही जिल्हा व तालुका मुख्यालय असल्यामुळे या शहरात सन १९३५ साली शासन नियुक्त नगरपालिका अस्तित्वात आली. अर्थात ती लोकनियुक्त नव्हती. हैद्राबाद संस्थानाच्या भारतीय संघराज्यातील विलीनिकरणानंतर ही नगरपालिका बरखास्त होऊन सन १९५२ मध्ये नवीन नांदेड नगरपरिषद अस्तित्वात आली. या नगरपरिषदेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष **श्री. शंकरराव भाऊराव चव्हाण** होते.

नांदेड शहराच्या प्रशासनासाठी तसेच लोककल्याण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सन १९३५ मध्ये नांदेड नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली, त्यावेळेचे नगरपरिषदेचे क्षेत्रफळ केवळ १६.४८ चौ. कि.मी. इतके होते. तेव्हाची शहरी लोकसंख्या ५४,७०८ होती. सन १९९१ च्या जनगणनेनुसार शहरालगतच्या वाघाळा ग्रामपंचायतीला नगर दर्जा देण्यात आला. वाघाळा नगरपालिकेत जवळपासची कौठा, रहीमपूर (बळिरामपूर), फत्तेजंगपूरि, असर्जन, असदवन ही गावे समाविष्ट करण्यात आली. वाढते शहरीकरण आणि नांदेड व आसपासच्या गावांची वाढ लक्षात घेऊन नांदेड नगरपालिका आणि वाघाळा नगरपालिका यांचे एकत्रीकरण करून शासन अधिसूचना क्रमांक १५९६ / ३५४/ प्र. क्र. २२५ / नवि -२४ दिनांक २६ मार्च, १९९७ नुसार **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, दिनांक २६ मार्च १९९७ पासून** अस्तित्वात आली. या नवनिर्मित नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त महापौर **श्री. सुधाकर रामराव** पांढरे आणि पहिले **आयुक्त श्री आनंद लिमये** भा.प्र.से. **हे** होते.

हैद्राबाद संस्थानाच्या कालावधीत नांदेड नगरपरिषदेचा कारभार **हैद्राबाद नगरपरिषद आणि नगरसमित्या अधिनियम १९५१** नुसार आणि विलिनीकरणानंतर **हैद्राबाद जिल्हा नगरपरिषद अधिनियम १९५६** नुसार त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे कायदे लागू झाल्यानंतर १९६५ पासून **महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५** नुसार आणि महानगरपालिकेच्या निर्मितीपासून म्हणजेच सन १९९७ पासून **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम** मधील तरतुदीनुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा कारभार केला जातो.

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची रचना



# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे लोकनियुक्त महापौर आणि त्यांचा कालावधी

| अ. क्र. | महापौर यांचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर रामराव पांढरे | २१.१०.१९९७ – २८.१०.१९९८ |
| २ | श्रीमती मंगला महादेव निमकर | २८.१०.१९९८ – २७.१०.१९९९ |
| ३ | श्री. गंगाधर पुरभाजी मोरे | २८.१०.१९९९ – २९.१०.२००२ |
| ४ | श्री. ओमप्रकाश गणेशलाल पोकर्णा | २९.१०.२००२ – २८.०४.२००५ |
| ५ | श्रीमती अ. शमीम बेगम अ. हफीज | २८.०४.२००५ – २७.१०.२००७ |
| ६ | श्री. बलवंतसिंघजी गोविंदसिंघ गाडीवाले | २३.१०.२००७ – १७.०६.२००९ |
| ७ | श्री. प्रकाशचंद हेमराज मुथा | ०६.०७.२००९ – २८.०४.२०१० |
| ८ | श्री. अजयसिंह रघुनाथसिंह बिसेन | २९.०४.२०१० – ०१.११.२०१२ |
| ९ | श्री. अ. सत्तार अ. गफुर | ०१.११.२०१२ – २३.०४.२०१५ |
| १० | श्रीमती शैलजा किशोर स्वामी | २७.०४.२०१५ – ३१.१०.२०१७ |
| ११ | श्रीमती शीलाबाई किशोर भवरे | ०१.११.२०१७ – २५.०५.२०१९ |
| १२ | श्रीमती दिक्षा कपिल धबाले | ०१.०६.२०१९ – २१.०९.२०२० |
| १३ | श्रीमती मोहिनी विजय येवनकर | २२.०९.२०२० – ३०.०९.२०२१ |
| १४ | श्रीमती जयश्री. निलेश पावडे | १३.१०.२०२१ – ३०.१०.२०२२ |

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त आणि त्यांचा कालावधी

| अ. क्र. | आयुक्त यांचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री. आनंद लिमये भा.प्र.से. | २६.०३.१९९७ – २२.०५.१९९७ |
| २ | श्री. आर. के. पिंगळे भा.प्र.से. | २३.०५.१९९७ – २५.१०.१९९८ |
| ३ | श्री. एस. डी. ठोंबरे भा.प्र.से. | २५.१०.१९९८ – २६.०४.१९९४ |
| ४ | श्री. पराग लिमये भा.प्र.से. | २८.०६.१९९९ – १३.१२.१९९९ |
| ५ | श्री. के. व्ही. कुरूंदकर भा.प्र.से. | १३.१२.१९९९ – १२.०६.२००२ |
| ६ | श्री. रमेश माज्रीकर भा.प्र.से. | १२.०६.२००२ – ०९.०९.२००५ |
| ७ | श्री. राधेश्याम मोपलवार भा.प्र.से. | ०९.०९.२००५ – १३.०७.२००६ |
| ८ | डॉ. दीपक म्हैसेकर भा.प्र.से. | १३.०७.२००६ – ०४.०८.२०१० |
| ९ | डॉ. निपुण विनायक भा.प्र.से. | ०५.०९.२०१० – २२.०३.२०१२ |
| १० | श्री. राम गगराणी | २३.०२.२०१२ – १६.०४.२०१२ |
| ११ | डॉ. श्रीकर परदेशी भा.प्र.से. | १६.०४.२०१२ – २४.०७.२०१४ |
| १२ | श्री. जी. श्रीकांत भा.प्र.से. | २२.०५.२०१२ – २४.०७.२०१४ |
| १३ | श्री. निशिकांत देशपांडे | २४.०७.२०१४ – ०८.०२.२०१५ |
| १४ | श्री. सुशील खोडवेकर भा.प्र.से. | २३.०५.१९९७ – २५.१०.१९९८ |
| १५ | श्री. सुरेश काकाणी भा.प्र.से. | ०६.०५.२०१६ – २९.०६.२०१६ |
| १६ | श्री. समीर उन्हाळे म.श.प्र.से. | ३०.०६.२०१६ – ०३.०६.२०१७ |
| १७ | श्री. गणेश देशमुख म.श.प्र.से. | ०६.०३.२०१७ – १८.०४.२०१८ |
| १८ | श्री. अरुण डोंगरे भा.प्र.से. | १८.०४.२०१८ — ०८.०५.२०१८ |
| १९ | श्री. लहुराज माळी भा.प्र.से. | ०८.०५.२०१८ – १६.१२.२०१९ |
| २० | श्री. अरुण डोंगरे भा.प्र.से. | ०९. ०१.२०२० – १७.०२.२०२० |
| २१ | डॉ. विपिन ईटणकर भा.प्र.से. | २७.०२.२०२० – ०७.०४.२०२० |
| २२ | डॉ. सुनील लहाणे म.श.प्र.से. | ०७.०४.२०२० – ३१.०५.२०२२ |
| २३ | डॉ. महेशकुमार डोईफोडे म.श.प्र.से. | ०१.०६.२०२२ – आजतागायत |